दिनांक १९.०६.१९९५ च्या शासन निर्णयानुसार सुरू झालेल्या महाविद्यालयांमध्ये नव्याने सुरू करावयाच्या विद्याशाखा, विषय व अतिरिक्त तुकडया यांना मंजूर करावयाच्या अनुदानाबाबत.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आवक विभाग :-
डी डी./आय. डी. ओ.
07 NOV 2022
विभाग :- 105
सही :-

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण - २०२१/(२३/२१)/मशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २८ ऑक्टोंबर, २०२२.

संदर्भ : १) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, क्र. एनजीसी ३५९५/नमवि/(००१/९५)/मशि-३, दि. १७.०६.१९९५.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. एनजीसी १०९७/अनु/(३७६/९७)/मशि-३, दिनांक ३१.०३.१९९९.
३) शासन पूरक पत्र क्र. मविसं १०९८/विस्तार-नुतनी/ (२४७/९८)/ मशि-३, दि. २६.०५.१९९९.

**प्रस्तावना :-**

संदर्भाधीन क्रं. १ व २ येथील शासन निर्णय दिनांक १७.६.१९९५ व ३१.०३.१९९९ अन्वये मंजुर केलेल्या एकूण १० तालुक्यांमधील महाविद्यालयांमध्ये कालांतराने सुरु करण्यात येणाऱ्या नवीन विद्याशाखा, नवीन विषय (ऐच्छिक व विशेष स्तरावर) व नवीन तुकड्या यांना अनुदान देणेबाबत कोणती कार्यपद्धती अवलंबवावी याबाबत स्पष्टता नसल्याने शासनाने संदर्भाधीन क्र. ३ येथील शासन पूरक पत्र दि. २६.०५.१९९९ नुसार स्पष्टीकरण करण्यात आले होते.

शासनाने दिनांक १७.०५.२००१ नंतर कायम विना अनुदान तत्वाचे धोरण स्विकारले असल्यामुळे आता शासन पुरकपत्र दिनांक २६.०५.१९९९ नुसार कार्यवाही अपेक्षित नाही. त्यामुळे तत्कालीन परिस्थितीमध्ये निर्गमित केलेले दिनांक २६.०५.१९९९ रोजीचे शासन पुरकपत्र रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, संदर्भाधीन क्र. ३ येथील दिनांक २६.०५.१९९९ रोजीचे पूरक पत्र या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रविणकुमार पवार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति : १. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
३. उप सचिव (मशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे
६. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण
७. निवडनस्ती (मशि-४)

SSV
29/11/22